SJIF 2016 : 4.44
ISSN: 2348-3083
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR
HUMANITY SCIENCE & ENGLISH LANGUAGE

# सर्व शिक्षा अभियान जालना जिल्हा परिषद अंतर्गत नियमित प्राथमिक शाळा म्हणून मान्यता मिळालेल्या वस्तीशाळांच्या भौतिक आणि शैक्षणिक सुविधांचा अभ्यास

विजय पांजारकर

Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com

## प्रस्तावना :—

1 मे 1960 रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. तसेच महाराष्ट्रातील जिल्हयामधून 1 मे 1981 साली औरंगाबाद व परभणी जिल्हयातील काही भाग मिळून जालना जिल्हयाची निर्मिती झाली. जालना जिल्हा स्वतंत्र निर्माण झाला. तेव्हा पासून आजपर्यंत जिल्हयात प्राथमिक शिक्षणाचे कार्य सुरु आहे. शासनाकडून शिक्षणा संबधिचे सर्व उपकमाची कार्यवाही जालना जिल्हा परिषद शिक्षण विभाग करीत असतो व करीत आहे. शिक्षणाच्या उपकमातील एक भाग म्हणजे सर्व शिक्षा अभियान होय. सर्व शिक्षा अभियानाची उद्यिष्टे पूर्ण करण्याकरीता शासनाने ठरवून दिलेले उपकम सुध्दा कार्यवाही सह अमलबजावणीत शिक्षण विभागाने आणले. सर्व शिक्षा अभियानचे उदिष्टे 100 टक्के पटनोंदणी, 100 टक्के उपस्थिती, दर्जेदार शिक्षण अशी आहेत. त्यातील 100 टक्के पटनोंदणीचे उद्यिष्टे साध्य करताना 6 ते 14 वयोगटातील प्रत्येक मुल शाळेत दाखल करणे त्यासाठी वाडया वस्तीवर शाळा उघडणे या धोरणान्सार ज्या वस्ती वर शाळा नाही तसेच ज्या वस्तीचे अंतर उपलब्ध असलेल्या प्राथमिक शाळेपासून 1.5 किलोमीटर पेक्षा जास्त आहे वस्तीवर 100 लोकसंख्या आहे. त्या ठिकाणी शाळा दाखल पात्र विद्यार्थी संख्या 20 व त्यापेक्षा जास्त आहे. त्या ठिकाणी सन 2000 साली शासनाच्या सूचनेनूसार वस्ती शाळा सुरु करण्यात आल्या. जालना जिल्हयात सुमारे 400 वस्ती शाळा सुरु करण्यात आल्या.

## समस्या विधान :—

सर्व शिक्षा अभियान जालना जिल्हा परिषद अंतर्गत नियमित प्राथमिक शाळा म्हणून मान्यता मिळालेल्या वस्तीशाळांच्या भौतिक आणि शैक्षणिक सुविधांचा अभ्यास.

1

## उदिष्टे :–

1) जालना जिल्हयातील वस्ती शाळेतून प्राथमिक शाळेत रुपांतरीत झालेल्या प्राथमिक शाळांचा अभ्यास करणे.

2) जालना जिल्हयातील वस्ती शाळेतून प्राथमिक शाळेत रुपांतरीत झालेल्या प्राथमिक शाळेतील भौतिक सुविधाचा अभ्यास करणे.

3) जालना जिल्हयातील वस्ती शाळेतून प्राथमिक शाळेत रुपांतरीत झालेल्या प्राथमिक शाळेतील शैक्षणिक सुविधांच्या अभ्यास करते.

4) वस्ती शाळांच्या अध्यापनाचे काम करणा–या निम–शिक्षकांच्या शैक्षणिक पात्रता आवड, योगदान इत्यादी बाबीची माहीती गोळा करणे.

5) जालना जिल्हयातील वस्ती शाळेतून प्राथमिक शाळेत रुपांतरीत होण्यासाठी निम–शिक्षकांना कराव्या लागलेल्या संर्घषाची नोंद घेणे.

6) रुपांतरीत झालेल्या प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यामध्ये विकसीत झालेल्या इतर कौशल्यांची माहिती संकलीत करणे.

## मर्यादा व व्याप्ती :–

जालना जिल्हयातील जिल्हा परिषद अंतर्गत सन 2009–10 मध्ये ज्या वस्ती शाळांचे प्राथमिक शाळेत रुपांतर झाले त्याच प्राथमिक शाळेपूरतेच मर्यादीत आहे. व्याप्ती ही जालना जिल्हयापुरतीच आहे.

2

## संशोधन पध्दती :–

प्रश्न विचारण्याच्या काळजीपूर्वक आयोजिलेल्या पध्दती आणि नमूना निवडीच्या शास्त्रीय पध्दती वापरुन केलेले शैक्षणिक समस्येचे संशोधन म्हणजे सर्वेक्षण होय. सर्वेक्षण पध्दती मध्ये एका विशिष्ट वेळेच्या परिस्थितीत, खूप मोठया जनसंख्येच्या संदर्भात माहिती गोळा केली जाते. एका व्यक्तीच्या गुणवैशिष्टयांशी संबध नसतो. सर्वेक्षणाचा संबध मोठया संख्येमधून माहिती काढून त्यावरुन सर्वसामान्य संख्याशास्त्रीय माहितीशी असतो. म्हणून या संशोधनात सर्वेक्षण पध्दती वापरण्यात येणार आहे.

## विषय :–

शिक्षण ही अविरत चालणारी प्रकिया आहे. शिक्षणाने वर्तनात ईष्ट असा बदल होत असतो. ज्या शिक्षणाने वर्तनात बदल होतो. पण तो बदल हा चांगला होणे गरजेचे असते. हा

चांगला बदल होण्यासाठी चांगल्या संस्काराचा गरज आहे. हे चांगले संस्कार विद्यार्थ्यांना शाळेतून देण्याचे कार्य सदैव सुरु असते. पण आपल्या देशामध्ये काही वस्त्या, वाडे, तांडे असे होते की तेथे शाळाच नव्हत्या. आज ती परिस्थीती नाही. सन 2001 – 2002 मध्ये शासन निणर्यानूसार निष्कर्ष पूर्ण करणा–या जालना जिल्हामध्ये सुमारे 400 वस्ती शाळा सुरु करण्यात आल्या होत्या. वस्ती शाळा विषयी माहीती पाहतांना शासनाने हया शाळा सुरु का केल्या हया विषयी जाणून घेणे गरजेचे आहे. आपला देश हा कृषीप्रधान देश आहे. देशातील 80 टक्के लोक शेतीचे व शेतमजुरीचे काम करतात त्या कारणासाठी व इतर काही कामासाठी उदा. उस तोड, विटभटटी,

3

कारखाण्यात कामासाठी लोक सर्व कुटूंबासह स्थलांतर करतात व काही त्याच ठिकाणी वस्ती करुन राहतात. त्याच्या सोबत ते आपल्या पाल्यांना घेउन जातात. त्यामुळे हया विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान तर होतंच पण या बालकांना शाळेतच जायला मिळत नाही कारण वस्तीवर शाळा नाही हया बालकांना कसे शिक्षण देता येईल या बाबीचा विचार करुन वस्ती शाळा सुरु करण्यात आल्या होत्या.

देशाचा विकास आणि उत्कर्षात शिक्षण हा मोठा घटक आहे. तसेच भारतीय राज्यघटनेच्या 45 व्या कलमानुसार सहा ते चौदा वयोगटातील सर्व मुलामुलींना प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्यात आले आहे. तसेच सन 2002 साली घटनेत दुरुस्ती करुन मूलभूत हक्क म्हणून प्राथमिक शिक्षणाच्या घटनेच्या 21 अ या कलमात अंतर्भाव करण्यात आला आहे. दिनांक 18 जानेवारी 2002 च्या शासन आदेशानुसार प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करुन सर्व शिक्षणातंर्गत केंद्र शासनाने विहित केलेली उद्धिष्टे राज्याच्या संदर्भात पूर्ण करण्याच्या दृष्टीने राज्यामध्ये सर्व शिक्षा अभियान या कार्यकमात अंमलात आणण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. सर्व शिक्षा अभियान या कार्यकमाची अंमलबजावणी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई या स्वायत संस्थेकडे पुरविण्यात आली आहे. हया स्वायत संस्थेने प्रत्येक वस्तीवर त्या वस्तीच्या जवळ असणा–या गावाच्या म्हणजे ग्प्रम शिक्षण समिती व त्या गावातील शाळेच्या सहकार्याने प्रत्येक वस्तीवर काही निकष ठरवून देउन वस्ती शाळा सुरु करण्यात आल्या होत्या. ते ठरवून दिलेले निकष म्हणजे ती वस्ती गावापासून 1.5 कि.मी. अंतरावर आहे. त्या वस्तीची लोकसंख्या ही 100 पेक्षा जास्त आहे. त्या वस्तीमध्ये शाळा दाखल होण्यायोग्य 20 पेक्षा जास्त विद्यार्थी आहे.

वरील निकषाप्रमाणे जालना जिल्हा परिषद अंतर्गत 2001 ते 2002 दरम्यान आठही तालुक्यामध्ये सुमारे 400 वस्ती शाळा सुरु करण्यात आल्या होत्या. हया वस्ती शाळेमध्ये अध्यापन करण्यासाठी त्या वस्तीवर राहणा–या व्यक्ती किंवा त्या वस्ती संलग्न गावातील व्यक्ती पैकी

शासनाने ठरवून दिलेल्या निकष व ग्प्रम शिक्षण समिती तसेच ग्राम पंचायत ठरावानूसार निम शिक्षक म्हणून नेमणून करण्यात आल्या होत्या. आजही हे शिक्षक या शाळेवर कार्यरत आहेत.

4

शासनाने पुढे सन 2006 मध्ये नेमलेल्या समितीच्या अहवाला वरुन हया वस्ती शाळा बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला त्यावेळी या शाळेत कार्य करणा–या निम शिक्षक यांनी केलेला विरोध त्या शाळेतील विद्यार्थ्यांचा प्रश्न यावर विचार करुन व काही समित्या तसेच अधिका–याच्या भेट अहवाला वरुन शासनाने सन 2009 मध्ये हया शाळांचे रुपांतर प्राथमिक शाळेत करण्याचा निर्णय घेण्यात आला हा निर्णय निकषानुसार जालना जिल्हा परिषद अंतर्गत 324 वस्ती शाळांचे रुपांतर प्राथमिक शाळेत सन 2009 पासून करण्यात आले आहे.

या रुपांतरीत प्राथमिक शाळेत भौतिक सुविधा हया कमी अधिक प्रमाणात असल्याचे संशोधकाच्या निदर्शनास आले आहे. तसेच शैक्षणिक सुविधेच्या बाबतीत सुध्दा आढळून आलेले आहे. जालना जिल्हातील आठ तालुक्यातील 83 शाळा हया न्यादर्श असून संशोधकाने हया शाळेतील भौतिक व शैक्षणिक साहित्याचा अभ्यास केला सर्वेक्षण पध्दतीने प्रत्येक शाळेतून संकलीत माहिती मिळवली आहे. त्यानुसार निष्कर्ष काढण्यात आले आहे.

## निष्कर्ष :–

1) वस्ती शाळातून नियमित प्राथमिक शाळेत रुपांतरित केलेल्या प्राथमिक शाळा हया भौतिक परिस्थतीनूसार काही सुरु केलेल्या आहे.

2) हया शाळेत कमी–अधिक प्रमाणात रुपांतरीत प्राथमिक भौतिक व शैक्षणिक सुविधा आहे.

3) भौतिक व शैक्षणिक सुविधाचां सार्थ फरक जाणून आला आहे.

4) ज्या ठिकाणी भौतिक सुविधा चांगल्या प्रमाणात आहेत. त्या शाळेची भौतिक गुणवत्ता चांगल्या प्रमाणात आहे.

5) ज्या ठिकाणी शैक्षणिक सुविधा चांगल्या प्रमाणात आहेत त्या शाळेची शैक्षणिक गुणवत्ता चांगल्या प्रमाणात आहे.

5

6) ज्या ठिकाणी भौतिक सुविधा कमी प्रमाणात आहेत त्या शाळेची भौतिक गुणवत्ता चांगल्या प्रमाणात दिसून आली नाही.

7) ज्या ठिकाणी शैक्षणिक सुविधा कमी प्रमाणात आहेत त्या शाळेची शैक्षणिक गुणवत्ता चांगल्या प्रमाणात दिसून आली नाही.

8) प्राथमिक शाळेची गुणवत्ता चांगली हवी असेल तर भौतिक व शैक्षणिक सुविधा आवश्यक आहे.

9) शैक्षणिक व भौतिक सुविधा हया विद्यार्थ्यांच्या प्रमाणात असायला हव्यात.

10) निम शिक्षकांनी दिलेल्या लढयाला यश आले असून त्यानी केलेला लढा हा योग्य व विद्यार्थी हितकारक होता.

## संदर्भ

*जरग, नामदेवराव : सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापन शिक्षक मार्गदर्शक,महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे 30*
*जरग, नामदेवराव : बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम 2009 मार्गदर्शिका, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे 30 (2012)*
*डॉ. आगलावे प्रदिप : सामाजिक संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे श्री साईनाथ प्रकाशन नागपूर 2010*
*कुंडले सुरेखा आणि इतर (2005) संशोधन मार्गदर्शिका भाग – 1 नाशिक : कुलसचिव य.च.म.मु.वि. नाशिक*
*कुंडले म.बा : शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र श्री विद्या प्रकाशन पुणे – 30*
*डॉ. पाटील बा.भा. : संशोधन पध्दती पब्लिकेशन्स, जळगाव 2012*
*डॉ.सौ. देशमुख एन.बी. : संशोधन पध्दती प्रशांत पब्लिकेशन्स जळगाव 2013*
*डॉ.सौ. पेंडके प्र.सु : शिक्षणाची तात्विक आणि समाजशास्त्रीय भूमिका, विद्या प्रकाश नागपूर 2010*
*डॉ.दादासाहेब शिरगावे, डॉ. रघुनाथ चौत्रे श्री महेश साचणे : शिक्षणशास्त्र निराली प्रकाशन, शिवाजीनगर पुणे, 2011*